अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । शनिवार
२१.११.२०२६

वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २९१ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

नरहरी झिरवाळांचे पीए डॉ.गाडेंचं निलंबनाचे आदेश

बेकायदेशीर धाड प्रकरणी मुख्यमंत्री कार्यालयातून आदेश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई - मंत्री नरहरी झिरवाळ यांचे तत्कालीन पीए डॉ. रामदास गाडे यांचं निलंबन करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. बेकायदेशीर धाड प्रकरणी मुख्यमंत्री कार्यालयातून सूचना देण्यात आल्या आणि अखेर आदेश निघाले असल्याची माहिती आहे. झिरवळ यांचे तत्कालीन पीए डॉ. रामदास गाडे (जी ठरावरी ऋरवश) पशुसंवर्धन खात्याचे अधिकारी त्यांना उसनवारी तत्वावर अन्न औषध प्रशासन खात्यात घेण्यात आले होते. गाडे यांचा खात्याकडून निलंबनाचा प्रस्ताव मुख्यमंत्री कार्यालयात गेला होता. मुख्यमंत्री कार्यालयाकडून निलंबनाचे आदेश देण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे.



रामदास गाडे हे पशु व दुग्ध विकास खात्याचे अधिकारी आहेत, त्या खात्यातून उसनवारी तत्वावर अन्न व औषध प्रशासन खात्यामध्ये घेण्यात आले होते, त्यामुळे हा प्रस्ताव अन्न औषध प्रशासनाचा नाही तर दुग्ध विकास खात्याकडून राज्य सरकारला देण्यात आला होता, मुख्यमंत्री कार्यालयामध्ये बरेच दिवस तर पेंडिंग होता, आता त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे, आणि रामदास गाडे यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. थेट मुख्यमंत्री कार्यालयातून ही कारवाई करण्यात आली आहे.

राज्याचे अन्न आणि औषध प्रशासन (एफडीए) मंत्री नरहरी झिरवाळ यांचे तत्कालीन खासगी सचिव आणि पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय कार्यालयात साहाय्यक आयुक्त असणारे डॉ. रामदास गाडे यांच्या निलंबनाचे आदेश पशुसंवर्धन विभागाने काढले. धाडीच्या प्रकरणाची विस्तृत चौकशी झाली. मंत्री नरहरी झिरवाळ यांचे तत्कालीन खासगी सचिव रामदास गाडे यांनी सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यंत्रणेवर दबाव आणून, बेकायदेशीर निर्देश देत, कायद्याच्या कसोटीवर न टिकणारी कारवाई करण्यास भाग पाडले, असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला. गाडे यांचे निलंबन करून त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची शिफारस करण्यात आली होती. याच प्रकरणातील एफडीएचे चार अधिकारी ३० ऑक्टोबर रोजी निलंबित झाले. मंत्री झिरवाळ यांचे तत्कालीन खासगी सचिव रामदास गाडे दोषी असल्याचे सांगणारा व त्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव मंत्री झिरवाळ यांच्याकडेच गेला होता. तेथून तो मुख्यमंत्री कार्यालयात पाठवण्यात आला होता. गाडे यांची स्वतंत्र फाइल सादर करावी, अशा सूचना मुख्यमंत्री कार्यालयातून देण्यात आल्या होत्या. त्यानंतर पशुसंवर्धन विभागाने (गाडे यांचा मूळ विभाग) तसा प्रस्ताव पाठवला. अखेर त्यांच्याही निलंबनाचे आदेश काढण्यात आले.

पतीच्या मृत्यूनंतर पैशांवरून कौटुंबिक वादानं टोक गाठलं, दिर अनसासूनं शिक्षिकेला संपवलं; वाढदिवसा दिवशीच लेक झाली पोरकी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



पुणे - जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातून एक अतिशय खळबळजनक प्रकार समोर आला आहे. पतीच्या मृत्यूनंतर पैशांचा वाद पेटला आणि हाच वाद विकोपाला जाऊन त्यातून शिक्षिकेची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या प्रकरणी दिर आणि सासू यांना ही हत्या केल्याचा आरोप असून पोलिसांनी आरोपीला अटक केल्याची माहिती आहे. मात्र या रक्तरंजित घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

ही घटना पुरंदर तालुक्यातील पांगरे येथे घडली असून सध्या पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहे. पतीच्या मृत्यूनंतर पैशांवरुन कौटुंबिक वादानं टोक गाठलं, दिर अनब सासूनं शिक्षिकेला संपवलं

मिळालेल्या माहितीनुसार, शाळेत जाण्यासाठी घरातून बाहेर पडलेल्या उज्वला यांच्यावर गावातील रस्त्यावरच प्राणघातक हल्ला करण्यात आला. या प्रकरणी मृत महिलेचा मावसभाऊ गणेश दत्तात्रय मेमाणे यांनी सासवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दिर शशिकांत काकडे आणि सासू सुलोचना काकडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उज्वला काकडे या पांगारे येथे आपल्या मुलीसह राहत होत्या. त्या हडपसर येथील साधना विद्यालयात शिक्षिका म्हणून नोकरी करत होत्या. त्यांचे पती रामदास माणिकराव काकडे यांचे १३ जून २०२६ रोजी कर्करोगाने निधन झाले होते. पतीच्या निधनानंतर त्यांच्या आर्थिक व्यवहारांवरून उज्वला आणि सासरच्या मंडळींमध्ये वाद निर्माण झाला होता. पतीच्या निधनानंतर आपले पैसे, धनादेश, सोन्याचे दागिने आणि महत्त्वाची कागदपत्रे परत मिळावीत, यासाठी उज्वला यांनी दीर शशिकांत आणि सासू सुलोचना यांच्याकडे विचारणा केली होती. मात्र, त्यातून वाद वाढला.

महिला शिक्षकाची हत्या झाली त्याच दिवशी त्यांच्या मुलीचा वाढदिवस

दरम्यान, या वादाने टोक गाठलं आणि शशिकांत काकडे याने लोखंडी रॉड आणि विटेने त्यांच्या डोक्यावर गंभीर वार केल्याने त्या रक्ताच्या थारोळ्यात पडल्या. त्यांना तातडीने सासवड ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. त्यावेळी पोलिसांनी त्यांना मृत घोषित केले. ज्या दिवशी महिला शिक्षकाची हत्या झाली त्याच दिवशी त्यांच्या मुलीचा वाढदिवस होता. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास सासवड पोलीस करत आहेत.

पार्टीच्या बहाण्याने बोलावलं, दारु पाजली अन सोन्याची चेन लुटत अल्पवयीन मुलीसोबत गैरकृत्य, मैत्रिणीसह चौघांवर गुन्हा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

ठाणे - परिसरातून एक अतिशय धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पार्टीला जाण्याच्या बहाण्याने मैत्रिणीने बोलावलेल्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर दोघांनी मिळून सामूहिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना मिरा रोड परिसरात उघडकीस आली आहे. एवढेच नव्हे तर आरोपींनी पीडित मुलीच्या गळ्यातील ५ ग्रॅम वजनाची सोन्याची चेनही काढून घेतल्याची माहिती समोर आली आहे.



दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनेचं गांभीर्य लक्षात घेत तपास सुरु केला. या प्रकरणी पोलिसांनी पीडितेच्या मैत्रिणीसह चार जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मात्र या घटनेनं परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलीला तिच्या महिला मैत्रिणीने मिरा रोड येथे पार्टीसाठी बोलावले होते. यावेळी दोन तरुणांनी तिला जबरदस्तीने मद्यप्राशन करण्यास भाग पाडले. त्यानंतर तिच्यावर सामूहिक लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. याचदरम्यान आरोपींनी तिच्या गळ्यातील ५ ग्रॅम सोन्याची चेनही काढून घेतली. दरम्यान, रात्र उलटूनही मुलगी घरी परतली नसल्याने कुटुंबीयांनी तिचा शोध सुरू केला. त्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी या प्रकरणी चार जणांविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे मिरा रोड परिसरात खळबळ उडाली आहे.

कुर्ला फिनिक्स मॉलजवळ जोडप्याला मारहाण, ८ अल्पवयीन मुलांना घेतलं ताब्यात

तरुणाला दगड, बेल्टने मारलं, मुलीच्या डोक्यात लाकूड घातलं

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई - कुर्ला येथील फिनिक्स मॉलजवळ असलेल्या पालिकेच्या उद्यानात एक धक्कादायक घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे. एक तरुण आणि तरुणी उद्यानात फोटो काढत असताना आठ ते दहा अल्पवयीन मुलांनी त्यांची छेडछाड केली आणि या वादातून या तरुण तरुणीला बेदम मारहाण केली आहे. कालची (२० नोव्हेंबर) ही घटना असून या तरुण तरुणीच्या तक्रारीवरून घाटकोपर पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. या घटनेचा व्हिडीओ काही स्थानिकांनी मोबाईलमध्ये रेकॉर्ड केला असून



समाज माध्यमात तो प्रचंड व्हायरल होत असून संताप व्यक्त केला जात आहे. घाटकोपर पोलिसांनी तक्रार दाखल होताच आठ अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

नेमकं काय घडलं?

मुंबईतील कुर्ला पश्चिम येथील फिनिक्स मॉल (फिनिक्स मार्केटसिटी) परिसरातील उद्यानाजवळ एका जोडप्याला सात ते आठ अल्पवयीन तरुणांच्या टोळक्याने मारहाण करत असल्याचं व्हिडीओमधून दिसून येत आहे. दगड, कंबरेवरील बेल्ट, लाकडाचा वापर करुन संबंधित अल्पवयीन तरुणांनी मुलासह तरुणीलाही मारहाण केल्याचं समोर आलं आहे. मुलीच्या डोक्यातही लाकडाने फटका मारण्यात आला. तसेच तरुणाला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केल्याचे व्हिडीओमधून दिसून येत आहे. नेमकं काय घडलं, याबाबत अधिकृत कोणतीही माहिती समोर आली नाही. परंतु सदर व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाल्यानंतर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. सार्वजनिक ठिकाणी या तरुणांच्या टोळक्याने जोडप्यावर हल्ला केल्याचा आरोप आहे. घटनेत सहभागी असलेल्या तरुणांची ओळख पटवणे, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणे, संबंधित जोडप्याच्या सुरक्षिततेची खात्री करणे आणि दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करणे, अशा मागण्या पोलिसांकडे करण्यात आल्या आहेत.

अकोल्यात पैशांचा पाऊस पाडण्याच्या अघोरी पूजेत एका तरुणाचा नरबळी; विकी शिंदेला अटक

लिंबू हवेत उचलत असतानाचा व्हिडीओ व्हायरल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

अकोला - अकोल्यात पैशांचा पाऊस पाडण्याच्या अघोरी पूजेत तरुणाचा नरबळी दिल्याचा धक्कादायक प्रकार आला समोर आला आहे. सदर प्रकरणी अकोल्यात 'पैशांचा पाऊस' पाडण्यासाठी अघोरी पूजा करून तरुणाचा नरबळी दिल्याचा आरोपातील संशयित विकी शिंदेला पोलिसांनी अटक केली आहे. अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याअंतर्गत संशयित



विवेक उर्फ विकी शिंदे याला सिव्हिल लाईन पोलिसांनी अटक केली.

हेमंत प्रफुल्ल सपकाळ असं मृत तरुणाचं नाव असून, इंदूरमध्ये अघोरी पूजेदरम्यान त्याचा नरबळी दिल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला होता. तर या प्रकरणी अकोल्यातील सिव्हिल लाईन पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, विकी शिंदे नामक मांत्रिकाचे अघोरी पूजेचे व्हिडीओ व्हायरल झाले होते. अकोला आणि इंदूरमधील एमजी रोड पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.



दुष्काळी उपाययोजनांवर काम करतांना सर्व यंत्रणांनी समन्वय राखा - आ.सुलभा खोडके

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

अमरावती – शहरी भागातील संभाव्य दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच प्रभावी उपाययोजनांची अंमलबजावणी करावी. शहरातील नैसर्गिक व कृत्रिम जलस्रोतांचे संवर्धन, नादुरुस्त विहिरींची दुरुस्ती, व जलपुनर्भरणाच्या कामांना प्राधान्य देऊन गती द्यावी, दुष्काळ परिस्थितीत शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचणे आवश्यक असून, प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा, अशा सुचना आमदार सुलभा यांनी दिल्यात.

तालुका प्रशासकीय कार्यालय अमरावती येथे आज दिनांक २० नोव्हेंबर रोजी आयोजित टंचाई आढावा बैठक व समन्वय समितीच्या सभेमध्ये अमरावती विधानसभा सभा क्षेत्रातील दुष्काळ सदृशस्थिती तसेच विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आणि प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीला विधान परिषद आमदार संजय खोडके, उपविभागीय अधिकारी अमरावती अनिल भटकर, अमरावती तहसीलदार संतोष आठरे, मनपा अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, संजय गांधी निराधार योजना तहसीलदार मिसाळ , निवासी नायब तहसीलदार कृष्णा गाडेकर आदींसह अधिकारी तसेच विविध शासकीय विभागांचे विभाग प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीमध्ये आमदार सुलभा खोडके यांनी सांगितले कि, आगामी



ऑगस्ट २०२७ पर्यंत एल-निनो चे संकट असून पाऊस पडण्याची कुठलीही शक्यता नाही. अमरावती शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या अप्परवर्धा धरणाची पाणी पातळी सुद्धा दिवसेंदिवस कमी होत असल्याने येत्या उन्हाळ्यात भीषण पाणी टंचाईची शक्यता वर्तविली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर अमरावती शहरात अनेक नैसर्गिक तसेच कृत्रिम जलस्रोत उपलब्ध असून, त्यांचे योग्य नियोजन व संवर्धन केल्यास भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यास मदत होऊ शकते. विशेषतः वडाळी तलालावाचे खोलीकरण व गाळ काढणे, शहरातील नादुरुस्त विहीरी यांची दुरुस्तीकरून जल स्रोत निर्माण करण्याची गरज आहे. रेन वाटर हार्वेस्टिंग करून पाण्याचे पुनर्भरण केल्यास टंचाई काळात पाणी उपयोगी पडेल.

बैठकीमध्ये संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, वृद्धापकाळ पेन्शन योजना, शेतकरी कर्जमाफी योजना तसेच अन्नधान्य पुरवठा योजना यांसह विविध शासकीय योजनांच्या चव्हाण , अन्न पुरवठा लाभार्थ्यांच्या प्रकरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अनेक पात्र लाभार्थ्यांची प्रकरणे विविध कारणांमुळे प्रलंबित राहत असल्याने त्यांची आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून प्रक्रिया गतीने पूर्ण करावी. कोणताही पात्र लाभार्थी शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे सुद्धा आमदार महोदयांनी स्पष्ट केले.

बैठकीला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपअभियंता मनोज वाकेकर , दिनेश सायगुंडे ,मनपा कार्यकारी अभियंता नं २ सुहास अधिकारी प्रवीण राऊत, आदींसह विविध शासकीय विभागांचे विभाग प्रमुख, तसेच मनपा माजी महापौर अँड. किशोर शेळके, माजी नगरसेवक प्रशांत डवरे, मनपा स्वीकृत नगरसेवक भोजराज काळे, सभापती ममता संदीप आवारे, नगरसेवक रतन डेंडूले, मंगेश मनोहरे, मनीष बजाज, चंद्रकांत उर्फ चंदू खेडकर, अर्चना मनीष पाटील, भूषण बनसोड, जितेंद्रसिंह ठाकूर, लकी नंदा, संजय बोबडे, योगेश सवाई, कर्नलसिंह राहल, अजय कोळपकर, अविनाश बोबडे आदींसह सर्व सहकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

राज्यस्तरीय बुवाबाजीविरोधी महिला परिषदेत अमरावती जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा प्रधान सचिव विजय डवरे यांचे आवाहन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२६ रोजी मुंबई येथे राज्यस्तरीय बुवाबाजीविरोधी महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत अमरावती जिल्ह्यातील महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रधान सचिव विजय डवरे यांनी केले आहे.

या परिषदेचे उद्घाटन खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते होणार असून, सुप्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान महा. अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे भूषविणार आहेत.

परिषदेच्या दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अनिल डोंगरे यांचे 'बुवाबाजी : बळी स्त्रियांचा, एक मानसशास्त्रीय विश्लेषण' या विषयावर व्याख्यान होणार आहे. तिसऱ्या सत्रात 'जेन-झी टॉक ऑन बुवाबाजी' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला असून, यामध्ये प्रियांका खेडेकर, हरी आवळे, शितल वसावे आणि गौरी जाधव हे तरुण कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

परिषदेच्या समारोप सत्राला ज्येष्ठ साहित्यिका प्रा. नीरजा आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री अनिता दाते यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सत्राचे अध्यक्षस्थान महा. अंनिसचे राज्य अध्यक्ष माधव बावगे भूषविणार आहेत.

मुंबई येथील मंत्रालयासमोरील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत ही परिषद पार पडणार आहे. राज्यभरातून ५०० पेक्षा अधिक महिला व पुरुष या परिषदेत सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती गेल्या ३७ वर्षांपासून अंधश्रद्धा निर्मूलन आणि व्यापक सामाजिक परिवर्तनासाठी संघटितपणे कार्यरत आहे. बुवाबाजी, भोंदूगिरी, शोषण आणि महिलांची फसवणूक करणाऱ्या अघोरी प्रथांविरोधात समितीने सातत्याने संघर्ष केला आहे. समितीच्या पुढाकाराने जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत आतापर्यंत १५०० पेक्षा अधिक गुन्हे दाखल करण्यात आले असून, काही भोंदू बाबा, बुवा आणि मांत्रिकांना शिक्षाही झाली आहे.

अमरावती जिल्ह्यातून सहभागाचे आवाहन

या राज्यस्तरीय परिषदेत अमरावती जिल्ह्यातील महिला, युवक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विवेकवादी चळवळीतील सर्व सहकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अमरावती जिल्ह्याच्या वतीने करण्यात आले आहे.

जिल्हा प्रधान सचिव विजय डवरे, साथी मंजू वासनिक, लता गजभिये, कीर्तिका सयामे, नरेंद्र धमार्ळे, प्रमोद कोळमकर, दिलीप लाडे, दिगंबर मेश्राम, आशिष देशमुख आणि संदीप हिवराळे यांनी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना या परिषदेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

बुवाबाजीविरोधातील लढा हा केवळ अंधश्रद्धेविरोधातील संघर्ष नसून महिलांचे शोषण, आर्थिक फसवणूक आणि मानसिक गुलामगिरीविरोधातील सामाजिक परिवर्तनाचा लढा आहे. या लढ्याला अधिक व्यापक आणि बळकट करण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी एकजुटीने या परिषदेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पीएम स्वनिधी सन्मान पुरस्कार वितरण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

नवी दिल्ली – पथविक्रेत्यांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणासाठी केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (पीएम स्वनिधी) योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत महाराष्ट्राने राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. नवी दिल्ली येथे आयोजित 'पीएम स्वनिधी सन्मान पुरस्कार २०२६' सोहळ्यात महाराष्ट्र राज्याला दोन, तर छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि परळी या शहरांना प्रत्येकी एक असे एकूण पाच राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या वतीने आयोजित या सोहळ्यात केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. केंद्रीय राज्यमंत्री तोखन साहू यावेळी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त अमोल येडगे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.



नागरिकांचे प्रश्न सुटले तरच महसूल सुधारणांना यश - अपर मुख्य सचिव विकास खारगे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रशासकीय सुधारणा आणि नागरिकाभिमुख योजनांची जिल्हास्तरावर प्रभावी अंमलबजावणी करून नागरिकांचे प्रश्न प्रत्यक्षात सोडविण्यावर भर द्यावा. मंत्रिमंडळाचे निर्णय, नवीन पोर्टल किंवा कायद्यातील बदल ही सुधारणांची सुरुवात असते. या निर्णयांमुळे नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळाला आणि त्यांचे प्रश्न सुटले, तरच महसूल सुधारणांना खऱ्या अर्थाने यश मिळते, असे महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित जिल्हाधिकाऱ्यांच्या राज्यस्तरीय परिषदेत ते बोलत होते. शासनाच्या धोरणात्मक निर्णयांना अपेक्षित परिणाम मिळवून देण्याची महत्वपूर्ण जबाबदारी जिल्हास्तरीय यंत्रणांवर आहे. त्यामुळे प्रशासनाने केवळ निर्णयांची अंमलबजावणी न करता त्यातून नागरिकांना मिळणाऱ्या सुविधांचा आणि लाभांचा नियमित आढावा घ्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले. मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, मुख्यमंत्री कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी राधा कुलकर्णी यांच्यासह सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यावेळी उपस्थित होते.

महसूल विभागात विविध सुधारणात्मक निर्णय घेण्यात येत आहेत. त्यांची माहिती अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी दिली. नागरिकांना मालमत्तेची सविस्तर माहिती उपलब्ध करून देणारे 'लँड टायटलिंग' विधेयक लवकरच अधिवेशनात मांडण्यात येणार आहे. राज्यात प्रत्येक तालुक्यात एकाच कार्यालयात दस्त नोंदणी, फेरफार व मालकी हक्क नोंदणीची सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे. शहरी भागातील प्रत्येक सदनिकाधारकाला स्वतंत्र मालमत्ता पत्रक देण्यासाठी 'व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड' योजना राबविण्यात येणार आहे.

महात्मा फुले साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी

डॉ.श्रीकांत तिडके, उदघाटक श्रीमंत माने तर प्रमुख अतिथी डॉ.अविनाश आवलगावकर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

अमरावती – क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जन्मोत्सव वर्षानिमित्त येत्या २९ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या महात्मा फुले विचार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध समीक्षक व लेखक प्राचार्य डॉ.श्रीकांत तिडके यांची निवड करण्यात आली आहे.

प्रसिद्ध पत्रकार व लेखक श्रीमंत माने करणार असून याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून मराठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.अविनाश आवलगावकर उपस्थित राहणार आहेत.



या संमेलनाचे आयोजन महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग यांच्या सहकार्याने गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट राधा नगर अमरावती, जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद, महा.अनिस अमरावती, महात्मा फुले द्वीशताब्दी जन्मोत्सव समिती मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती व इतर समविचारी संघटनांच्या वतीने करण्यात आले आहे. या संमेलनात पद्मश्री जनार्दनपंत बोथे, पंद्मश्री शंकरबाबा पापडकर, सत्यपाल महाराज, मराठा सेवा संघाचे राज्य सरचिटणीस चंद्रशेखर शिखरे खासदार बळवंत वानखडे खासदार अनिल बोंडे आमदार सुलभा खोडके, आमदार उमेश यावलकर, आमदार प्रवीण पोटे, साहित्य अकादमीचे प्रमोद मुनघाटे, साहित्य संस्कृती मंडळाचे श्रीपाद अपराजित, प्रभा गणोरकर संपादक प्रमोद काळबांडे संपादक विलास मराठे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ.मोना चिमटे शासकीय ज्ञान विज्ञान संस्थेचे संचालक डॉ.केशव तुपे जिजाऊ बँकेचे संचालक अरविंद गावंडे इत्यादी मान्यवरांना निमंत्रित केले आहे. संमेलनात उदघाटन, विविध क्षेत्रातील मान्यवरांचे सत्कार विविध लेखकांच्या पुस्तकांचे प्रकाशन, तीन परिसंवाद, दोन कवीसंमेलने, कथाकथन समारोप आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनात कोमल ठाकरे प्राध्यापक विजया मारोतकर विलास सिंदगीकर इत्यादी मान्यवर सहभागी होणार आहेत. संमेलनाचे यजमानपद मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.स्मिता देशमुख यांनी स्वीकारले असून याच महाविद्यालयात हे संमेलन होणार आहे. डॉ. सतीश तराळ या संमेलनाचे स्वागताध्यक्ष असून गुरुदेव सेवाश्रम ट्रस्टचे कार्याध्यक्ष श्रीधर डहाके, सचिव वसंतराव वंडलकर, कोषाध्यक्ष रामदास सदार उपाध्यक्ष शंकरराव बसू बाळासाहेब महल्ले कार्याध्यक्ष डॉ.दिलीप काळे, कोषाध्यक्ष डॉ.काशिनाथ बऱ्हाटे, पुरुषोत्तम गावंडे, उपाध्यक्ष डी.एस.पवार, सचिव चंदनसिंह राजपूत, उपेक्षित समाज महासंघाचे अध्यक्ष प्रा.श्रीकृष्ण बनसोड, विवेकानंद वाचनालयाचे सचिव डॉ.मंगेश निर्मळ, जगदीश बोंडे, सचिव प्रकाश आवारे, गाडगेबाबा विचार मंचचे अध्यक्ष प्रा. प्रभाकर ठाकरे ज्येष्ठ भगिनी मंडळाच्या अध्यक्ष डॉ.शोभा गायकवाड, बांधिलकी प्रतिष्ठानच्या अध्यक्ष ॲड.नीता कचवे, प्रा.डॉ.मंदा नांदुरकर, यावली शहीद जन्मभूमी समाजसेवा समिती अनंत हागवणे महा.अंधश्रद्धा निर्मूलन समिती कार्याध्यक्ष प्रफुल्ल मंदा श्रीधर,प्रधान सचिव विजय डवरे , जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ.राजवलीकर, मैना बुंदिले प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.अरुण बुंदेले इत्यादी संस्था व व्यक्ती या संमेलनाला सहाय्यक करीत आहेत.

मालमत्ता कराचे नव्याने मूल्यांकन होणार; आमसभेचा निर्णय जनहिता : अविनाश मार्डीकर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

अमरावती – अमरावती महानगरपालिकेत प्रशासकीय राजवट असतांना राज्य शासनाने वाढीव दराने मालमत्ता कर आकारण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय अन्यायकारक असल्याने महायुतीच्या आमदार सौ सुलभाताई खोडके आणि आमदार संजय खोडके साहेब यांनी या करवाढीवर स्थगनादेश आणला होता. मात्र, जानेवारी महिन्यामध्ये महानगरपालिकेचे सभागृह अस्तित्वात आल्यानंतर प्रशासनाने शासनाकडे पाठपुरावा केल्यानंतर, शासनाने हा स्थगनादेश उठवल्याचे पत्र महापालिकेला प्राप्त झाले आहे. असे असले तरी, यंदाची दुष्काळी परिस्थिती आणि नागरिकांची आर्थिक स्थिती लक्षात घेता गुरुवारी (१९ नोव्हेंबर) झालेल्या आमसभेने मालमत्ता कराचे नव्याने मूल्यांकन (असेसमेंट) करण्याचा निर्णय एकमताने घेतला आहे. हा निर्णय जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी असून, यात कोणीही राजकारण करू नये, असे आवाहन स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी केले आहे. शासनाने स्थगनादेश उठवल्यानंतर नागरिकांवर पुन्हा वाढीव कराचा बोजा पडण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर आमसभेत सविस्तर चर्चा होऊन नागरिकांच्या हिताला प्राधान्य देत नव्याने कर आकारणीचे मूल्यांकन करण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. आमसभेने घेतलेला हा निर्णय अत्यंत सर्वांगीण असून सर्वसामान्य अमरावतीकरांना दिलासा देणारा असल्याचे मनपा स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी स्पष्ट केले आहे. .



संपादकीय

स्वप्न मोठी ठेवा, प्रयत्न प्रामाणिक करा.
यश नक्कीच तुमच्या पावलांशी येईल!

पाणीटंचाईचे संकट : पाण्याचे नियोजन कधी करणार?

पाणी म्हणजे जीवन! मानवी जीवनापासून शेती, उद्योगधंदे, पशुधन आणि पर्यावरणापर्यंत प्रत्येक गोष्ट पाण्यावर अवलंबून आहे. मात्र, आज पाण्यासारख्या अत्यंत मूलभूत आणि जीवनावश्यक नैसर्गिक साधनसंपत्तीचे महत्त्व आपण खऱ्या अर्थाने ओळखले आहे का, हा प्रश्न उपस्थित होत आहे. दरवर्षी उन्हाळा जवळ आला की गावोगावी पाणीटंचाईचे संकट गडद होऊ लागते. कुठे पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना भटकंती करावी लागते, तर कुठे टँकरच्या पाण्यावर संपूर्ण गावाची तहान भागविण्याची वेळ येते. विहिरी कोरड्या पडतात, बोअरवेलची पाणीपातळी खोल जाते आणि हातपंप बंद पडतात. ही परिस्थिती केवळ नैसर्गिक संकट नसून आपल्या पाणी व्यवस्थापनातील त्रुटींचेही प्रतिबिंब आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पाणीटंचाई ही दरवर्षीची गंभीर समस्या बनत आहे. विशेषतः ग्रामीण भागात या समस्येची तीव्रता अधिक जाणवते. शेतकऱ्यांसाठी पाणी म्हणजे शेतीचा श्वास आहे. पावसाच्या अनिश्चिततेमुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत नसल्याने शेतीचे नियोजन कोलमडते. पिण्याच्या पाण्यासोबतच जनावरांच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतीवर याचा थेट परिणाम होतो. पाणीटंचाईसाठी केवळ कमी पाऊस किंवा निसर्गाला दोष देऊन चालणार नाही. पावसाचे प्रमाण कमी-जास्त होणे ही नैसर्गिक बाब असली, तरी उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे ही प्रशासनाची आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जाते. मात्र, त्यातील किती पाणी जमिनीत मुरते, किती पाणी साठवले जाते आणि किती पाण्याचा अपव्यय होतो, याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. अनेक ठिकाणी जलसंधारणाची कामे कागदावर पूर्ण झाल्याचे दाखवले जाते; प्रत्यक्षात मात्र त्यांचा अपेक्षित परिणाम दिसून येत नाही. दुसरीकडे, भूगर्भातील पाण्याचा बेसुमार उपसा सुरू आहे. वाढत्या बोअरवेलमुळे जमिनीखालील पाणीसाठ्यावर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. पाण्याचा उपसा वाढत असताना भूजल पुनर्भरणासाठी आवश्यक उपाययोजना मात्र अपेक्षित प्रमाणात होताना दिसत नाहीत. परिणामी दरवर्षी पाण्याची पातळी आणखी खाली जात आहे. आज पाण्यासाठी खोदल्या जाणाऱ्या बोअरवेलची संख्या वाढत आहे; मात्र उद्या त्यातून पाणी मिळेलच, याची शाश्वती कोण देणार? जलसंधारण केवळ घोषणांपुरते नको! सरकारकडून जलयुक्त शिवार, शेततळे, नाला खोलीकरण, बंधारे, पाझर तलाव आणि विविध जलसंधारण योजनांची अंमलबजावणी केली जाते. या योजना निश्चितच उपयुक्त आहेत; परंतु त्यांची अंमलबजावणी पारदर्शक आणि परिणामकारक होणे अधिक महत्त्वाचे आहे. गावागावांत पावसाचे पाणी अडविण्यासाठी योग्य ठिकाणी बंधारे बांधणे, जुन्या तलावांची दुरुस्ती करणे, नाल्यांचे खोलीकरण करणे आणि पाण्याचे नैसर्गिक स्रोत जिवंत ठेवणे आवश्यक आहे.



मूळव्याध, भगंदर आणि फिशर-लाज नको, उपचार घ्या!

भगन्दर रोग
Fistula-in-Ano

पाईल्स डे म्हणजे काय? हा दिवस साजरा करण्यासाठी नाही, तर जागरूकता निर्माण करण्यासाठी आहे. कारण आज भारतात प्रत्येक १० पैकी ४ व्यक्तींना कधी ना कधी मूळव्याध, फिशर किंवा भगंदरचा त्रास होतो. पण लाज, भीती आणि अज्ञान यामुळे लोक वर्षानुवर्षे दुखणे सहन करतात, चुकीचे औषध घेतात आणि आजार वाढवून घेतात.

आयुर्वेदात या आजारांना हजारो वर्षांपूर्वीच नाव दिले गेले आहे. सुश्रुत संहितेत आचार्य सुश्रुतांनी याला अर्श (मूळव्याध), परिकर्तिका (फिशर) आणि भगंदर (फिस्टुला) असे म्हटले आहे. सुश्रुताचार्यांना शल्यचिकित्सेचे जनक मानले जाते. त्यांनी सांगितले आहे की, हा आजार फक्त गुदद्वाराचा नाही, तर पचनसंस्थेचा, जीवनशैलीचा आणि मानसिक तणावाचा आरसा आहे.

मूळव्याध (पाईल्स) म्हणजे काय?
गुदद्वाराच्या आत आणि बाहेर रक्तवाहिन्यांचे गठ्ठे असतात. त्या गठ्ठ्यांना आपण पाईल्सचे मोड म्हणतो. जेव्हा सतत बद्धकोष्ठता, जोर लावून शौचाला बसणे, जास्त वेळ मोबाईल घेऊन टॉयलेटमध्ये बसणे, तिखट-तेलकट खाणे, पाणी कमी पिणे यामुळे त्या नसांवर दाब येतो, तेव्हा त्या सुजतात, रक्तस्त्राव होतो आणि बाहेर येऊ लागतात.

मूळव्याधाचे ४ ग्रेड असतात
ग्रेड १ : फक्त रक्त पडते, वेदना नसते. लोक याकडे दुर्लक्ष करतात.
ग्रेड २ : शौचाच्या वेळी मोड बाहेर येतो आणि आपोआप आत जातो.
ग्रेड ३ : मोड बाहेर येतो, हाताने आत ढकलावा लागतो.
ग्रेड ४ : मोड कायम बाहेरच राहतो, प्रचंड वेदना, सूज आणि रक्तस्त्राव होतो.
सुरुवातीच्या ग्रेडमध्ये आयुर्वेदिक औषध, आहार आणि जीवनशैली बदलाने १००% बरा होऊ शकतो. पण ग्रेड ३-४ मध्ये क्षारसूत्र किंवा क्षारकर्म सारख्या आयुर्वेदिक शस्त्रक्रियेची गरज पडते.

भगंदर (फिसतुला) म्हणजे काय?
भगंदर हा मूळव्याधापेक्षा जास्त त्रासदायक आणि जिद्दी आजार आहे. गुदद्वाराजवळ पूर्वी गळू (फोड) झाला असेल आणि तो फुटला असेल, तर आत एक बारीक नळी तयार होते. त्या नळीतून सतत पू, पाणी आणि कधी कधी रक्त येत राहते. ही नळी वर गुदद्वाराच्या आतपर्यंत गेलेली असते.


भगंदरची लक्षणे म्हणजे –
गुदद्वाराजवळ वारंवार फोड येणे, खाज येणे, ओलसरपणा वाटणे, कपडे खराब होणे, बसताना दुखणे, ताप येणे. अनेक रुग्ण याला साधा फोड समजून अँटिबायोटिक घेतात. फोड थोडा बरा होतो, पुन्हा येतो. हा खेळ वर्षानुवर्षे चालतो.
लक्षात ठेवा, भगंदर फक्त औषधाने पूर्ण बरा होत नाही. त्यासाठी क्षारसूत्र चिकित्सा हे आयुर्वेदाचे वरदान आहे. हे शास्त्रशुद्ध, शास्त्राने मान्य केलेले आणि खउचठ ने देखील मान्यता दिलेले उपचार आहे.

फिशर (फिशुर) म्हणजे काय?
कडक शौचामुळे गुदद्वाराच्या तोंडावर चीरा पडतो, त्याला फिशर म्हणतात. यात शौचाच्या वेळी काचेने कापल्यासारखी प्रचंड वेदना होते, थोडीशी जळजळ आणि रक्त येते. वेदनेमुळे रुग्ण शौचाला जाण्यास घाबरतो, शौच अडवून ठेवतो, त्यामुळे बद्धकोष्ठता वाढते आणि फिशर अजून वाढतो. हे दुष्टचक्र तोडणे गरजेचे आहे.

मूळव्याध, भगंदर का होतो?
आयुर्वेदाचे कारण आयुर्वेदानुसार याचे मूळ कारण आहे – मंदाग्नी, बद्धकोष्ठता आणि वात-पित्त-कफ दोषांचे बिघाड.
१. बद्धकोष्ठता : हे सर्वात मोठे कारण आहे. रोज पोट साफ न होणे.
२.चुकीचा आहार : मैदा, बेकरी पदार्थ, फास्ट फूड, जास्त तिखट, मांसाहार, दारू, चहा-कॉफीचे अतिसेवन.
३.बैठी जीवनशैली : ८-१० तास एका जागी बसून काम, व्यायाम नाही, चालणे नाही.
४.शौचाची सवय :शौचाला जोर लावणे, अर्धा-अर्धा तास मोबाईल घेऊन बसणे.
५.गर्भावस्था आणि प्रसूती : महिलांमध्ये बाळंतपणानंतर मूळव्याध होण्याचे प्रमाण जास्त असते.
६.मानसिक तणाव : चिंता, झोप न येणे यामुळे पचन बिघडते.
आयुर्वेद म्हणतो, जोपर्यंत पोट साफ नाही, तोपर्यंत मूळव्याध बरा होणार नाही. म्हणून आम्ही फक्त मोडावर उपचार करत नाही, तर पचनावर उपचार करतो.

आयुर्वेदिक उपचार –
ऑपरेशनशिवाय बरे होणे शक्य आहे का? हो, शक्य आहे. पण प्रत्येक रुग्णाला ऑपरेशन लागतेच असे नाही. आम्ही ३ टप्प्यांत उपचार करतो.
१. औषध चिकित्सा : त्रिफळा गुग्गुळ, अर्शोघ्नी वटी, अभयारिष्ट, कुटज, नागकेशर, हरीतकी यासारखी औषधे रक्तस्त्राव थांबवतात, सूज कमी करतात आणि पोट साफ ठेवतात. पण ही औषधे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेऊ नका. प्रत्येकाची प्रकृती वेगळी असते.
२. क्षारकर्म आणि क्षारसूत्र चिकित्सा : ही आयुर्वेदाची खास देणगी आहे. क्षारसूत्र म्हणजे औषधी वनस्पतींच्या क्षाराने सिद्ध केलेला धागा. भगंदरच्या नळीत हा धागा बांधला जातो. हा धागा हळूहळू नळीला कापत जातो आणि मागून जखम भरत जातो. यामुळे गुदद्वाराचे स्नायू कापले जात नाहीत, त्यामुळे संडासवर कंट्रोल जाण्याचा धोका नसतो, जो आधुनिक मोठ्या ऑपरेशनमध्ये असतो.
मूळव्याधमध्ये क्षारसूत्राने मोड बांधला जातो, ५-७ दिवसात मोड गळून पडतो. यात मोठी चीरा नाही, टाके नाहीत, १ दिवसात घरी जाता येते आणि पुन्हा होण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे.
३. आहार आणि विहार (जीवनशैली) : उपचाराइतकाच आहार महत्त्वाचा आहे. औषध घेतले आणि आहार पाळला नाही, तर आजार पुन्हा येणारच.
काय खावे? काय टाळावे? खावे : भरपूर पाणी (दिवसाला ३-४ लिटर), ताक, दही, पालेभाज्या, फळे – पपई, केळी, अंजीर, मनुका, भिजवलेले बदाम, तूप, ज्वारी-बाजरीची भाकरी, मूग डाळीचे वरण.
टाळावे : मैदा, पाव, बेकरी, पिझ्झा, बर्गर, जास्त तिखट, लोणचे, पापड, मांसाहार, दारू, सिगारेट, चहा-कॉफी, रात्री उशिरा जेवणे.
सवयी : रोज ३० मिनिटे चालणे, सकाळी उठल्यावर कोमट पाणी पिणे, शौचाला जोर न लावणे, ५ मिनिटांपेक्षा जास्त टॉयलेटमध्ये न बसणे, गरम पाण्याने शेक घेणे (सिट्झ बाथ), १० मिनिटे गरम पाण्यात बसणे याने वेदना लगेच कमी होते.

लोकांच्या मनातील गैरसमज
गैरसमज १ : मूळव्याध म्हणजे कॅन्सर होतो.
सत्य : मूळव्याध म्हणजे कॅन्सर नाही. पण रक्त पडणे हे कॅन्सरचेही लक्षण असू शकते. म्हणून तपासणी न करता दुर्लक्ष करू नका.
गैरसमज २ : एकदा ऑपरेशन केले की पुन्हा होत नाही.
सत्य : आहार आणि बद्धकोष्ठता पाळली नाही, तर कोणत्याही ऑपरेशननंतर पुन्हा होऊ शकतो. क्षारसूत्रमध्ये पुन्हा होण्याचे प्रमाण कमी आहे, पण जीवनशैली पाळणे गरजेचे आहे.
गैरसमज ३ : जाहिरातीचे मलम लावले की मूळव्याध बरा होतो.
सत्य : मलमाने फक्त तात्पुरती सूज आणि खाज कमी होते. आतला आजार बरा होत नाही.
गैरसमज ४ : डॉक्टरकडे दाखवायला लाज वाटते.
सत्य : डॉक्टरसाठी हा इतर आजारासारखाच आजार आहे. लाजेमुळे लोक ५-१० वर्षे त्रास सहन करतात आणि ग्रेड १ चा आजार ग्रेड ४ करून येतात.
कधी तात्काळ डॉक्टरकडे जावे?
जर शौचातून जास्त रक्त जात असेल, चक्कर येत असेल, वजन अचानक कमी होत असेल, गुदद्वाराजवळ गाठ काळी पडली असेल, खूप ताप आणि पू येत असेल, तर अजिबात वेळ वाया घालवू नका. ही लक्षणे गंभीर असू शकतात. पाईल्स डे चा खरा संदेश हाच आहे – लपवू नका, घाबरु नका, वेळेवर उपचार घ्या. आयुर्वेदात म्हटले आहे, शरीराला समजून घ्या, निसर्गाशी जुळवून घ्या. पोट साफ ठेवा, मन शांत ठेवा, आहार साधा ठेवा. तर मूळव्याध, भगंदर, फिशर सारखे आजार तुम्हाला कधीही त्रास देणार नाहीत. तुम्हाला किंवा तुमच्या घरात कोणाला असा त्रास असेल, तर जवळच्या अनुभवी आयुर्वेदिक पाईल्स-फिस्टुला तज्ञांना भेटा. तपासणी करुन घ्या. आजार लहान असताना उपचार घेतला, तर ऑपरेशनशिवाय बरा होतो.
लाज सोडा, आरोग्याकडे लक्ष द्या – हाच पाईल्स डे चा संकल्प



डॉ.मिलिंद खेरडे
मुळव्याध भंगदर, फिशर चिकित्सक, वरुड, जि.अमरावती
९४२२९५६८४६

शिक्षिका ते राज्यपाल... आनंदीबेन पटेल यांचा संघर्षमय आणि प्रेरणादायी राजकीय प्रवास!

शिक्षण, सामाजिक कार्य आणि सार्वजनिक जीवनातील प्रदीर्घ अनुभवाच्या जोरावर राजकारणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल यांचा आज २१ नोव्हेंबर रोजी वाढदिवस. २१ नोव्हेंबर १९४१ रोजी गुजरातमधील मेहसाणा जिल्ह्यातील खरोद येथे त्यांचा जन्म झाला. आज त्या वयाची ८५ वर्षे पूर्ण करीत आहेत.

आनंदीबेन पटेल यांचा जीवनप्रवास
हा शिक्षणक्षेत्रापासून सुरू होऊन राज्याच्या मुख्यमंत्रीपदापर्यंत आणि पुढे राज्यपालपदापर्यंत पोहोचलेला आहे. त्यांच्या सार्वजनिक जीवनातील प्रवासात शिक्षण, सामाजिक कार्य, प्रशासकीय जबाबदाऱ्या आणि राजकीय वाटचाल यांचा महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे.

शिक्षण क्षेत्रातून सार्वजनिक जीवनाकडे वाटचाल
आनंदीबेन पटेल यांनी विज्ञान विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले असून एम.एड. पदवीमध्ये सुवर्णपदक प्राप्त केले आहे. त्यांनी अहमदाबाद येथील मोहिनाबा गर्ल्स हायस्कूलमध्ये प्राचार्य म्हणून काम पाहिले. शिक्षणक्षेत्रातील अनुभवामुळे विद्यार्थ्यांच्या समस्या, महिला शिक्षण आणि सामाजिक विकास या विषयांशी त्यांचा जवळचा संबंध राहिला.
शिक्षिका आणि प्राचार्य म्हणून काम करताना त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाचे महत्त्व अधोरेखित केले. पुढे याच अनुभवाचा उपयोग त्यांनी सार्वजनिक आणि राजकीय जीवनात केला.

राजकीय प्रवासाची सुरुवात
१९८७ मध्ये त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश केला. भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षपदासह पक्षसंघटनेतील विविध जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या. १९९४ ते १९९८ या कालावधीत त्या राज्यसभेच्या सदस्य होत्या. त्यानंतर १९९८ मध्ये गुजरात विधानसभेवर निवडून आल्या.



१९९८ ते २००२ या काळात त्यांनी गुजरात सरकारमध्ये शिक्षण तसेच महिला व बालकल्याण मंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली. त्यानंतरही विविध विधानसभा निवडणुकांमध्ये विजय मिळवत त्यांनी महसूल, आपत्ती व्यवस्थापन, रस्ते व इमारती, शहरी विकास आणि महिला व बालकल्याण यांसारख्या विभागांची मंत्री म्हणून धुरा सांभाळली.

गुजरातच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री
२२ मे २०१४ हा त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील महत्त्वाचा दिवस ठरला. या दिवशी त्यांनी गुजरातच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारला. ७ ऑगस्ट २०१६ पर्यंत त्यांनी मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सांभाळली.
गुजरातच्या राजकीय इतिहासात पहिल्या महिला मुख्यमंत्री होण्याचा मान त्यांना मिळाला. त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात शिक्षण, महिला व बालकल्याण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि विकासविषयक विविध विषयांवर शासनस्तरावर काम करण्यात आले.
राज्यपालपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी
मुख्यमंत्रीपदानंतर त्यांच्या सार्वजनिक जीवनातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा सुरू झाला. २३ जानेवारी २०१८ रोजी त्यांनी मध्य प्रदेशच्या राज्यपालपदाची शपथ घेतली. त्यानंतर छत्तीसगडच्या राज्यपालपदाचीही जबाबदारी त्यांच्याकडे आली. २९ जुलै २०१९ रोजी त्यांनी उत्तर प्रदेशच्या राज्यपालपदाचा कार्यभार स्वीकारला. आजही त्या उत्तर प्रदेशच्या राज्यपाल म्हणून कार्यरत आहेत. राज्यपाल या घटनात्मक पदावर काम करताना विद्यापीठे, उच्च शिक्षण, सामाजिक उपक्रम आणि विविध संस्थांच्या कामकाजाशी संबंधित जबाबदाऱ्या त्या सांभाळत आहेत. महिला नेतृत्वासाठी महत्त्वाचा प्रवास भारतीय राजकारणात महिलांचा सहभाग आणि नेतृत्व हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. अशा परिस्थितीत शिक्षिका म्हणून कारकीर्द सुरू करून राज्याच्या सर्वोच्च कार्यकारी पदापर्यंत पोहोचण्याचा आनंदीबेन पटेल यांचा प्रवास महिलांसाठी अभ्यासाचा विषय ठरतो. राजकीय क्षेत्रात महिलांनी विविध जबाबदाऱ्या स्वीकाराव्यात, नेतृत्वगुण विकसित करावेत आणि सार्वजनिक जीवनात सक्रिय सहभाग घ्यावा, या दृष्टीने त्यांचा प्रवास उल्लेखनीय आहे.

वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव
आज २१ नोव्हेंबर रोजी आनंदीबेन पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना विविध स्तरांतून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत. शिक्षिका, प्राचार्य, आमदार, मंत्री, गुजरातच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री आणि राज्यपाल अशा विविध जबाबदाऱ्यांमधून त्यांनी सार्वजनिक जीवनात दीर्घकाळ योगदान दिले आहे. त्यांच्या पुढील आयुष्यास उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि आनंद लाभो, हीच वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक सदिच्छा!

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

मेळघाटातील लाडक्या बहिणींना लखपती दिदी बनवणार- राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

चुरणीत साधला महिलांशी संवाद, जारीदा वीज उपकेंद्रालाही दिली भेट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





अमरावती - एकही मुलगी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, यासाठी पालकांनी मुलींना आग्रहाने शिकवावे, बालविवाहाला पुढाकार घेऊन कृतीतून आळा घालावा. शिक्षणासोबतच आर्थिक प्रगती करून मेळघाटातील लाडक्या बहिणींना लखपती दिदी करण्यात येईल, असा विश्वास महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण व ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी आज महिला संवाद कार्यक्रमात व्यक्त केला.

राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या उपस्थितीत चुरणी येथील आदिवासी सांस्कृतिक भवनात महिला संवाद कार्यक्रम पार पडला. यावेळी आमदार केवलराम काळे, अचलपूरच्या नगराध्यक्ष रुपाली माथने, प्रभुदास भिलावेकर, आरोग्य उपसंचालक डॉ. आरती कुलवाल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारीसे उपस्थित होते.

राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी,राज्य व केंद्र शासनाच्या महिला आणि बालकांसाठी विविध योजना राबविण्यात येते. या कल्याणकारी योजना आणि कार्यक्रमांमुळे मेळघाटातील महिला व बालमृत्यू दरात घट झाली आहे. या भागातील संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण उत्तमरित्या वाढले आहे. गरोदर महिलांना प्रसुतीपूर्व आणि पश्चात सकस आहार व उत्तम आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालयांसह आशा, अंगणवाडी सेविका दुर्गम भागातही घरोघरी जाऊन योजना प्रभावीपणे पोहचवित आहेत. या माध्यमातून गरोदर माता, स्तनदा माता आणि नवजात बालकांची काळजी घेण्यात येत आहे.

राज्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' आणि 'लेक लाडकी योजनां'ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. महिलांना शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्यात येत आहे. महिलांना वार्षिक १ ते ५ लाखांचे उत्पन्नश्रचे साधन मिळवून देत देशातील ३ कोटी महिलांना लखपती दिदी बनविण्याची महत्वाकांक्षी योजना हाती घेण्यात आली आहे.राज्यातही ५० लाख लखपती दिदी बनविण्याचा निर्धार करण्यात आला आहे. या कार्याला अधिक गती देऊन प्रभावी अंमलबजावणीतून लखपती दिदी निर्माण करण्यावर भर देण्यात येईल.

यावेळी आमदार श्री. काळे, नगराध्यक्ष श्रीमती माथने, श्री. भिलावेकर यांनी मार्गदर्शन केले. काटकुंभ येथील साई महिला बचत गटाच्या प्रमुख सरोजनी नागले, काजलडोह येथील आशा गट प्रवर्तिका मालती ऊईके, चुरणी येथील अंगणवाडी सेविका शिला सुखदेवे यांनी मनोगत व्यक्त केले.

सुरूवातीला स्थानिक महिला व पुरुषांनी पारंपरिक आदिवासी नृत्याद्वारे राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांचे स्वागत केले. तत्पूर्वी राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी काटकुंभ येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, चुरणी येथील ग्रामीण रुग्णालयाला भेट दिली. तसेच जारीदा येथील ३३ केव्ही क्षमतेच्या वीज उपकेंद्राला भेट दिली. चुरणी गावातील दोन अंगणवाड्या आणि आरोग्य वर्धिनी आशा उपकेंद्रालाही भेट देऊन पाहणी केली.

'दिवाळी अंक हे मनाची भूक भागवणारे उत्कृष्ट खाद्य' दिवाळी अंकाच्या प्रदर्शनात संजय देशमुख यांचे प्रतिपादन



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

अमरावती – ज्याप्रमाणे दिवाळीत आपल्याला आवडीचे फराळाचे पदार्थ खायला आवडतात, त्याचप्रमाणे मनाची आणि विचारांची भूक भागवण्यासाठी दिवाळी अंक हे एक उत्कृष्ट बौद्धिक खाद्य असल्याचे प्रतिपादन उत्कृष्ट ग्रंथालय सेवक पुरस्कार प्राप्त संजय देशमुख यांनी केले.

अमरावती शासकीय विभागीय ग्रंथालय आणि सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिवाळी अंक प्रदर्शनाचे उदघाटन देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.सहायक ग्रंथालय संचालक डॉ. राजेश पाटील,शासकीय विभागीय ग्रंथालयाचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय बनसोड आणि उभय कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी आणि ग्रंथालयात अभ्यास करणारे विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना देशमुख म्हणाले,दिवाळी अंक हे एक बौद्धिक खाद्य असून सर्व विद्यार्थी आणि वाचकांनी या दिवाळी अंक प्रदर्शनाचा लाभ घ्यावा.या प्रदर्शनात विविध साहित्यिक आणि वैचारिक विषयांच्या दिवाळी अंकांसोबतच विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी इयत्ता १०वीचे प्रश्नपत्रिका संच आणि इतर उपयुक्त शैक्षणिक साहित्यही उपलब्ध करून देण्यात आले आहे. या उपक्रमाचा सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, अशा शुभेच्छाही त्यांनी यावेळी दिल्या.



वरुड : प्रसिध्द बालरोग तज्ञ डॉ.प्रवीण चौधरी यांना वाढदिवसा निमित्त पुष्पगुच्छ व पुस्तक भेट देतांना अरविंद वानखडे, प्रा.अश्वपाल वानखडे तथा उपस्थित प्रसिध्द स्त्रि रोग व प्रसुती तज्ञ डॉ.समता चौधरी.

६ हजार शेतकऱ्यांना होणार एकवेळ समझोता कर्जमुक्तीचा लाभ : २ लाखांवरील रक्कम भरुन लाभ घेण्याचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

अमरावती - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६च्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत एकवेळ समझोता आधार प्रमाणीकरणासाठी पहिली यादी आज प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये जिल्ह्यातील ६ हजार ३०६ पात्र शेतकऱ्यांचा समावेश आहे. यातील शेतकऱ्यांनी दोन लाख रूपयांवरील रक्कम भरून कर्जमुक्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

आतापर्यंत जिल्ह्यातील १ हजार ८७१ लाभार्थ्यांनी एकवेळ समझोतासाठी आधार प्रमाणीकरण केले आहे. पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची यादी संबंधित बँक शाखा, विकास संस्था आणि ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. यादीतील तपशील तपासून पात्र शेतकऱ्यांनी आपल्या कर्जातील २ लाखावरील हिश्श्याची रक्कम संबंधित बँकेत जमा करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांची एकापेक्षा जास्त कर्जखाती



आहेत, त्यांनी कोणत्याही कर्जखात्यात रक्कम भरण्याची सुविधा आहे. मात्र एका खात्यात एकवेळ समझोताप्रमाणे नमूद देय रकमेपेक्षा जास्त रक्कम भरू नये. शेतकऱ्यांनी हिश्श्याची रक्कम भरण्यासाठी अंतिम मुदत दि. ३१ मार्च २०२७ आहे.

शेतकऱ्यांनी रक्कम भरल्यानंतर बँकेमार्फत दर शुक्रवारी माहिती पोर्टलवर अपलोड केली जाणार आहे. थकबाकी अद्ययावत झाल्यानंतर तीन दिवसांनी आधार प्रमाणीकरणाची सुविधा मिळणार आहे. ज्या शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण आहे, त्यांनाच आधार प्रमाणीकरण करून शासनाकडून २ लाखाच्या कर्जमुक्ती लाभ दिला जाणार आहे. ही एकवेळ समझोता यादी केवळ पहिली यादी असून, बँकांकडील माहितीच्या संगणकीय संस्करणानंतर पुढील याद्याही प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. मयत, वयस्कर तसेच बोटांच्या ठशाची नोंद होत नसल्यास लाभार्थ्यांसाठी दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजीच्या मानक कार्यप्रणालीनुसार कार्यवाही केली जाणार आहे.

विकसित महाराष्ट्राच्या ध्येयपूर्तीसाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा

राज्यस्तरीय जिल्हाधिकारी परिषदेत मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांचे प्रतिपादन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – विकसित महाराष्ट्राचे ध्येय साध्य करण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करावा. ग्रामीण भागात लघुउद्योगांना प्रोत्साहन आणि रोजगारनिर्मितीला चालना देऊन नागरिकांचे जीवन सुलभ करण्यात योगदान द्यावे. भारतीय प्रशासकीय सेवेची प्रतिमा अधिक उज्ज्वल करण्यासाठी अधिकाऱ्यांनी लोकांमध्ये राहून जनभावना जाणून घेऊन काम करावे, असे आवाहन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केले.

विकसित महाराष्ट्राचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जिल्हास्तरावर प्रभावी नियोजन, विकासकामांची गती आणि प्रशासकीय यंत्रणेतील समन्वय अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय जिल्हाधिकारी परिषदेत मुख्य सचिव अग्रवाल बोलत होते. या परिषदेस महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्यासह राज्यातील विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य सचिव अग्रवाल म्हणाले की, प्रशासकीय अधिकारी हे धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करणारे घटक असून त्यांची पदस्थापना कोणत्या ठिकाणी आहे, यापेक्षा त्यांनी विकासासाठी दिलेले योगदान अधिक महत्वाचे आहे. राज्य सकल उत्पादन, वस्तू व सेवा कर संकलन आणि थेट परकीय गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे. राज्याची ही बलस्थाने लक्षात घेऊन विकसित महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी प्रत्येक अधिकाऱ्याने सकारात्मक आणि परिणामकारक दृष्टिकोनातून काम करणे आवश्यक आहे.

राज्यातील ५० टक्क्यांपेक्षा अधिक नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील बदलत्या लोकसंख्यात्मक परिस्थितीचा विचार करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील घटता जन्मदर, शाळांमधील कमी होणारी विद्यार्थीसंख्या आणि तरुणांच्या तुलनेत ज्येष्ठ नागरिकांचे वाढते प्रमाण या बाबी ग्रामीण विकासासाठी आव्हानात्मक ठरू शकतात. ही परिस्थिती लक्षात घेऊन ग्रामीण भागात लघुउद्योगांची उभारणी आणि विस्तार करण्यास प्रोत्साहन द्यावे. यामुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण होऊन शहरांकडे होणारे स्थलांतर रोखण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

लोकप्रतिनिधी नेहमी लोकांमध्ये असतात, त्यामुळे त्यांना वस्तुस्थिती चांगली माहिती असते. अधिकाऱ्यांनीही लोकांमध्ये जास्तीत जास्त मिसळून जनभावना समजून घ्याव्यात. मंत्रालयातील अवर सचिव, उपसचिव यांनी क्षेत्रभेटी कराव्यात, असे आवाहन करुन अधिकाऱ्यांनी जिल्ह्यापुरते मर्यादित न राहता व्यापक दृष्टिकोन ठेवावा. त्याच वेळी तळागाळातील वस्तुस्थितीचे भानही ठेवावे, असे मुख्य सचिवांनी सांगितले.

मेगा एमएसएमई क्रेडिट आउटरीच कॅम्पमध्ये २२ कोटी कर्जाचे वितरण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

अमरावती – सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अमरावती क्षेत्राच्या वतीने आज वऱ्हाडे मांगल्य येथे मेगा एमएसएमई क्रेडिट आउटरीच कॅम्प पार पडला. या कॅम्पमध्ये जिल्ह्यातील विविध व्यावसायिक व उद्योजकांना एकूण २२ कोटी रुपयांच्या कर्जाचे वितरण करण्यात आले.

अभिनंदन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्षस्थानी शिवाजी देठे होते, प्रमुख पाहुणे म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, भातकुली पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी तृप्ती बिरुडकर, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक शोएब



कादरी, सेंट्रल बँकेचे क्षेत्रिय प्रबंधक पन्नम कुमार, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी श्री. काकडे यांनी, जिल्ह्याची अग्रणी बँक असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाने जिल्ह्याच्या आर्थिक विकासामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. जिल्ह्यातील उद्योजक, व्यावसायिक व लघुउद्योजकांना आर्थिक पाठबळ देऊन त्यांच्या व्यवसाय वृद्धीसाठी बँक सातत्याने प्रयत्नशील असल्याचे नमूद केले.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रमुख पन्नम कुमार यांनी प्रास्ताविकातून बँकेच्या विविध एमएसएमई कर्ज योजना, उद्योगवाढीसाठी उपलब्ध आर्थिक सुविधा, तसेच उद्योजकांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. बँकेच्या माध्यमातून नवउद्योजकांना प्रोत्साहन देणे आणि विद्यमान उद्योगांना आर्थिक बळकटी प्रदान करण्यात येत असल्याचे सांगितले. मेगा एमएसएमई क्रेडिट आउटरीच कॅम्पच्या माध्यमातून विविध व्यावसायिक, उद्योजकांना २२ कोटी रुपयांचे कर्ज वितरीत करण्यात आले. यामुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना चालना मिळून रोजगारनिर्मिती आणि स्थानिक आर्थिक विकासाला हातभार लागणार आहे. यावेळी बी. अनुषा यांनी बँकेच्या कर्ज योजनांचे सादरीकरण केले. नवनीत इंगळे यांनी सूत्रसंचालन केले. अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी आभार मानले.

सोयाबीन आणि कापूस उत्पादकांच्या न्याय हक्कांसाठी

दुष्काळ संघर्ष यात्रेमध्ये अजिंक्य देशमुख यांचा सहभाग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड – तालुक्यातील संत्रा, सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकरी आज आर्थिक संकटाच्या खाईत लोटला गेला आहे. उत्पादन खर्च गगनाला भिडला, दुष्काळाच्या सावटान शेती उध्वस्त केली आणि बाजारपेठेत शेतमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या हातात काहीच उरत नाही. एकीकडे शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबला जात असताना दुसरीकडे शासनाकडून केवळ आश्वासनांची खैरात सुरू आहे. आता मात्र शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केवळ चर्चा नव्हे तर आरपारची लढाई लढण्याची भूमिका वरुड तालुक्यातून पुढे येत आहे.

याच पार्श्वभूमीवर वरुड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी अजिंक्य देशमुख मैदानात उतरले असून त्यांनी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली बुलढाणा जिल्ह्यात सुरू असलेल्या दुष्काळ संघर्ष यात्रेत सहभागी होऊन वरुड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने जाहीर पाठिंबा दिला.

यावेळी वरुड तालुक्यातील संत्रा, सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांना संघर्ष यात्रेच्या माध्यमातून शासन दरबारी पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. संत्रा उत्पादकांना ७ हजार रुपये प्रतिक्विंटल भाव मिळालाच पाहिजे, सोयाबीनला १२ हजार रुपये प्रतिक्विंटल हमीभाव जाहीर करावा, कापसाला १५ हजार रुपये प्रतिक्विंटल भाव देण्यात यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी अजिंक्य देशमुख यांनी स्पष्ट भुमिका मांडली की, शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळणे ही शासनाची मेहरबानी नसून शेतकऱ्यांचा अधिकार आहे. शेतकऱ्यांना केवळ कर्जमाफी, मदत आणि पॅकेजच्या घोषणांमध्ये गुंतवून ठेवता येणार नाही. संत्रा, सोयाबीन आणि कापूस उत्पादकांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळालाच पाहिजे. वरुड तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न शासनाने गांभीर्याने घेऊन तातडीने ठोस निर्णय घ्यावेत अन्यथा शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी वरुड तालुक्यातही व्यापक जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही अजिंक्य देशमुख यांनी दिला.



ट्रान्सफॉर्मर अभावी ४० ते ४५ शेतकऱ्यांचे संत्रा पीक धोक्यात

शेतकऱ्यांचा जलसमाधी आंदोलनाचा इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड – मौजा लिंगा येथील शेतकऱ्यांना मागील दोन महिन्यांपासून बंद पडलेल्या ट्रान्सफॉर्मरमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे परिसरातील सुमारे ४० ते ४५ शेतकऱ्यांचे संत्रापीक तसेच खरीप हंगामातील पिकांचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. वारंवार निवेदने देऊन आणि संबंधित अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊनही महावितरण विभागाकडुन कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

लिंगा येथील रोशन मनोहर कळंबे यांच्या शेतामध्ये सध्या ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आलेला आहे. मात्र, या ट्रान्सफॉर्मर पर्यंत जाण्यासाठी शेतातून ये-जा करावी लागत असल्याने शेतीमालाचे नुकसान होत आहे. त्यामुळे सदर ट्रान्सफॉर्मर शेताबाहेर रस्त्यालगत नवीन जागेवर स्थलांतरित करुन देण्यात यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी अनेकदा केली आहे. यासंदर्भात संबंधित विभागाला चार वेळा लेखी निवेदने देण्यात आली असुनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. विशेष म्हणजे, मागील दोन वर्षांपासून नवीन ट्रान्सफॉर्मरकरिता स्ट्रक्चर उभारण्यात आले असुनही कंत्राटदाराने त्याचे काम अद्याप पुर्ण केलेले नाही. याबाबत पुसला, वरुड आणि मोर्शी येथील महावितरणच्या अभियंत्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे. तरीदेखील कामाला गती मिळालेली नाही. याशिवाय ट्रान्सफॉर्मर बंद पडल्याने शेतकऱ्यांची समस्या अधिक गंभीर बनली आहे. या प्रश्नावर शेतकऱ्यांनी यापूर्वी दिनांक २ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी ४८ तासांच्या आत ट्रान्सफॉर्मर बसवून देण्याचे आदेश महावितरणला दिल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. मात्र, संबंधित कंपनीकडून टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकऱ्यांच्या मागण्यांची ३० नोव्हेंबरपर्यंत पूर्तता न झाल्यास १० डिसेंबर लिंगा येथील खडकपेंड मध्यम प्रकल्पात सर्व शेतकरी जलसमाधी आंदोलन करणार असल्याचा गंभीर गोपाल भडके व इतरांनी दिला आहे.



जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.१०३०/२०२६ **ने.ता.१७/१२/२०२६**

अर्जदार :-

१) संतोषराव राघोजी विघे, वय अं.७२ वर्ष, २) सुधाकर राघोजी विघे, वय अं.६५ वर्ष, क्र.१ व २ रा.वार्ड क्र.३ हातुर्णा, ता.वरुड, ३) मिना उर्फ विठाबाई महादेव कुडुपले, वय अं.६३ रा.काचुर्णा, ता.वरुड, ४) रत्नाबाई भगवानजी गाडबैल, वय अं.६० वर्ष, रा.गव्हाणकुंड, ता.वरुड, ५) छायाबाई निळकंठ गायकी, वय अं.५० वर्ष, रा.खैरगाव, ता.नरखेड, ६) मायाबाई प्रकाश घारपुरे, वय अं.५२ वर्ष, रा.नरखेड ता.नरखेड . . .

विरुध्द ...

गैरअर्जदार :- १) ज्ञानेश्वर राघोजी विघे, वय अं.५५ वर्ष, धंदा-शेती, २) प्रभाकर राघोजी विघे, वय अं.६३ वर्ष, धंदा-शेती, क्र.१ व २ रा.वार्ड क्र.३ हातुर्णा, ता.वरुड

निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत यमुना राघोजी विघे, रा.हातुर्णा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार व गैरअर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१७/११/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

प्राथमिक कृषी पतसंस्थांमधील कर्मचाऱ्यांच्या समावेशनाचे प्रस्ताव विचारात घ्या - सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांमधील संस्था नियुक्त सचिव, सहायक सचिव व लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना जिल्हा देखरेख सहकारी संस्थेच्या सेवेत सामावून घेण्याबाबत प्राप्त प्रस्तावांचा सकारात्मक विचार करावा. तांत्रिक कारणांमुळे मान्यता प्रलंबित असलेल्या प्रस्तावांवरही निर्णय घ्यावा. तसेच १८ फेब्रुवारी २०२५ नंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांचाही विचार करावा, असे निर्देश सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिले.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या दालनात बैठक झाली.या बैठकीसाठी प्रधान सचिव प्रविण दराडे, सहकार आयुक्त दिपक तावरे, सह सचिव तथा अप्पर निबंधक संतोष पाटील यांच्यासह सहकार विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. राज्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांमधील कर्मचाऱ्यांच्या समावेशनाबाबत एकूण १२१ प्रस्ताव प्राप्त झाले असून, १४ जिल्ह्यांचे प्रस्ताव जिल्हा उपनिबंधकांमार्फत सादर करण्यात आले आहेत. या सर्व प्रस्तावांची छाननी करून पात्र कर्मचाऱ्यांच्या समावेशनाबाबत आवश्यक कार्यवाही करावी, असे मंत्री पाटील यांनी सांगितले.



सचिवांना जिल्हा देखरेख सहकारी संस्थेच्या सेवेत सामावून घेण्यासाठी जिल्हा संवर्गाची मान्यता घ्यावी. तसेच नवीन भरतीदेखील जिल्हा संवर्गामार्फतच करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.३४१/२०२६ **ने.ता.३१/१२/२०२६**

अर्जदार : राहुल सतिश कानुगो

वय अं.४२ वर्ष, धंदा - व्यवसाय

रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी साहेब

नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे राहुल सतिश कानुगो याचा जन्म दि.०३/०७/१९८४ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **इलीयास खान युसुफ खान याचा जन्म दि.२७/०६/१९७२ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.३१/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०७/११/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.१०२८/२०२६ **ने.ता.१८/१२/२०२६**

अर्जदार :-

१) विजय गुलाबराव शिंगरवाडे, वय अं.५२ वर्ष, धंदा-घरकाम, २) अभिजीत गुलाबराव शिंगरवाडे, वय अं.४१ वर्ष, धंदा-शेती, क्र.१ व २ रा.टेलिफोन ऑफीस मागे वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, ३) योगिता संजय ठाकरे, वय अं.४९ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.भारती विद्यापीठ शाळेजवळ, पुणे, ४) कृतिका विरेंद्र तिजारे, वय अं.४६ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.हनुमान मंदीर जवळ, मानेवाडा रोड, नागपुर

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रजनी गुलाबराव शिंगरवाडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१८/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०५/११/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.३४०/२०२६ **ने.ता.०२/०१/२०२६**

अर्जदार : इलीयास खान युसूफ खान

वय अं.५४ वर्ष, धंदा-मजुरी

रा.बंगला चौक, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी साहेब

नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे इलीयास खान युसुफ खान याचा जन्म दि.२७/०६/१९७२ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **इलीयास खान युसुफ खान याचा जन्म दि.२७/०६/१९७२ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.०२/०१/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०७/११/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.१०१८/२०२६ **ने.ता.१९/१२/२०२६**

अर्जदार :-

१) उमादेवी गोपाल लांडगे, वय अं.५२ वर्ष, धंदा-घरकाम, २) स्नेहल गोपाल लांडगे, वय अं.३७ वर्ष, धंदा-घरकाम, ३) रजनी गोपाल लांडगे, वय अं.२६ वर्ष, धंदा-घरकाम, अर्जदार क्र.१ ते ३ रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती ४) शिवाणी विपुल टवळे, वय अं.३० वर्ष, धंदा-घरकाम, रा.हिंगणघाट फैल, पुलगांव, जि.वर्धा

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत गोपाल दौलतराव लांडगे, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१९/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/११/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड





ॲग्रीस्टॅक प्रणालीवर नोंदणी असलेल्या पात्र शेतकऱ्यांना निकषानुसार मिळणार मदत

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन संवेदनशील

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या शेती उत्पन्नावर तसेच आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम झाला आहे. पीक नुकसान, घटलेले उत्पन्न आणि शेतीवरील वाढता खर्च यामुळे अनेक शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा, मदत देण्यासाठी शासन संवेदनशील आहे. ॲग्रीस्टॅक प्रणालीवर नोंदणी असलेल्या दुष्काळी तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांना पीक नुकसानीसाठी लागू असलेल्या राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या (एनडीआरएफ) निकषांनुसार मदत वितरित करण्यात येत आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत वेळेत उपलब्ध करून देणे, पात्र लाभार्थ्यांच्या नोंदींची पडताळणी करणे आणि तांत्रिक कारणांमुळे प्रलंबित राहिलेली प्रकरणे निकाली काढणे यावर मदत व पुनर्वसन विभागाचा भर आहे. अशा प्रकरणांची छाननी करून निर्धारित निकषांनुसार पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना मदत देण्याची कार्यवाही केली जात आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन विभागाकडून देण्यात आली आहे.

आतापर्यंत राज्यातील ३१० तालुके दुष्काळग्रस्त घोषित

राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा विचार करून १४ ऑक्टोबर २०२६ रोजी ३०४ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले होते. त्यानंतर १९ नोव्हेंबर २०२६ रोजी आणखी सहा तालुक्यांचा समावेश करण्यात आला असून, राज्यातील एकूण दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३१० झाली आहे. या तालुक्यांतील बाधित शेतकऱ्यांना शासनाच्या निर्धारित निकषांनुसार मदत देण्याची कार्यवाही सुरू आहे.

पात्र शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रीम मदत

ॲग्रीस्टॅक प्रणालीवर राज्यातील सुमारे १ कोटी ३० लाख शेतकऱ्यांची नोंदणी होऊन त्यांना फार्मर आयडी देण्यात आला आहे. यापैकी सुमारे ९४ लाख पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत जमा करण्यात आली आहे. ही मदत शासन निर्णय २८ ऑक्टोबर २०२६ आणि पीक नुकसानीसाठी लागू असलेल्या राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या (एनडीआरएफ) निकषांनुसार वितरित करण्यात येत आहे.

मदतीचे वितरण निश्चित निकषांनुसार

पीक नुकसानीचे क्षेत्र ३३ टक्क्यांपेक्षा अधिक असलेल्या पात्र शेतकऱ्यांना निर्धारित निकषांनुसार मदत देण्यात येत आहे. मदत वितरणापूर्वी शेतकऱ्यांच्या माहितीची पडताळणी, नोंदींचे प्रमाणीकरण आणि पात्रतेची तपासणी करण्यात येते. पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यांमध्ये मदतीची रक्कम जमा केली जाते.

मुंबई-पुणे महानगर प्रदेशांतील पाणी पुरवठ्यासाठी दीर्घकालीन नियोजन करा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – मुंबई महानगर प्रदेशासाठी २०५१ पर्यंत आणि पुणे महानगर प्रदेशासाठी २०४७ पर्यंतची लोकसंख्या, नागरीकरण तसेच उद्योगांची वाढती गरज लक्षात घेऊन एकात्मिक, कालबद्ध आणि आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य दीर्घकालीन जलनियोजन तयार करावे. नवीन प्रकल्पांबरोबरच प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर, पाणीगळती नियंत्रण, पर्जन्यजल संचयन आणि पर्यायी जलस्रोतांवर भर द्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा या शासकीय निवासस्थानी मुंबई आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रांतील पाणी नियोजन व व्यवस्थापनाचा आढावा घेण्यात आला. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, मुंबई शहरचे सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा आदींसह विविध अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, वाढती लोकसंख्या, वेगाने होणारे नागरीकरण, उद्योग आणि डेटा सेंटरच्या वाढत्या गरजा विचारात घेऊन उपलब्ध जलस्रोतांचा कार्यक्षम वापर, पर्यायी जल स्रोतांचा शोध घेणे तसेच प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर वाढविण्यात यावा. तसेच सध्या राज्यात विशेषतः मुंबई व पुणे महानगरपरिसरात सुरू असलेले जलप्रकल्प वेळेत पूर्ण करणे, प्रस्तावित प्रकल्पांसाठी वन व पर्यावरणविषयक मान्यता, भूसंपादन आणि पुनर्वसनाची कार्यवाही समांतरपणे करणे तसेच उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले. महानगरपालिका आणि नगरपालिकांनी जललेखा परीक्षण करून पाण्याची आवक, वितरण आणि प्रत्यक्ष देयक आकारणी यांचा अचूक ताळमेळ ठेवावा. व्यावसायिक व औद्योगिक वापरासाठी स्मार्ट मीटरचा वापर वाढवून महसूल न मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण टप्प्याटप्प्याने कमी करावे, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. अंमलबजावणीतील वनजमीन, पर्यावरणविषयक मान्यता, भूसंपादन आणि पुनर्वसनाचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत. प्रकल्प सुरू करण्यापूर्वी आवश्यक मान्यता घेऊन प्रकल्पांच्या कामांना गती देण्यात यावी.

सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१२५५७० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने -१२०३०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,७५,००० रु. (प्र.किलो)

कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव (क्विंटलमध्ये)

ज्वारी -	१६५० -	२०००
गहू -	२५०० -	३०००
तूर -	६१०० -	६३९०
मूग -	६५०० -	७०००
उडीद -	६००० -	७०००
हरभरा -	५६०० -	५९००
सोयाबिन -	४१०० -	४३५०
बाजरा -	२००० -	२३००
तिळ -	८२०० -	९३००
भुईमूग -	५१५० -	५३५०
मका -	२२०० -	२३००



